विद्यावार्ता®

SPECIAL ISSUE-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal







## शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

# "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान " या विषयावर

# एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद




प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव


Scanned with OKEN Scanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ™

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

२७/०२/२०२०

## राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

समन्वयक

प्रा. तानाजी बोराडे

डॉ. दयानंद शिंदे

डॉ. किशोरकुमार गव्हाणे

प्राचार्य

डॉ. श्रीकृष्ण चंदनशिव

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

24) महात्मा ज्योतिबा फुले - स्त्रियांचे उद्धारक
**प्रा. शुभदा गणपतराव चांदवले, पुणे** ||77

25) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बील
**प्रा.डॉ. वानखेडे उमाकांत ज्ञानोबा, परळी वै.** ||80

26) महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारातील क्रांतिकारकत्व
**डॉ. मारोती तेगमपुरे, जालना** ||83

27) महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार
**सहा.प्रा. डॉ. नरसिंग आबासाहेब पवार, रामनगर जालना** ||86

28) नवभारत निर्माणात 'फुले, शाहु' यांचे योगदान
**डॉ. सुधीर ब. गायकवाड, जालना** ||88

29) राजर्षी शाहु महाराजांचे जलविषयक धोरण
**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे, उस्मानाबाद** ||92

30) छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक विचार (इ.स.१८७४-१९२२)
**डॉ. पठारे उत्तम आप्पासाहेब, पुणे** ||95

31) शाहु फुले आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
**प्रा. अंभोरे अशोक गंगाराम, हिंगोली** ||100

32) शाहू महाराज यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार
**बळीराम शेषेराव चव्हाण, स्नेहा राजेंद्र माने, महाराष्ट्र** ||104

33) महात्मा ज्योतिराव फुले यांचे कृषिविषयक विचार
**डॉ. अशोक बापूराव देवकर, बीड** ||108

34) म.जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
**प्रा.डॉ. संजय कुलकर्णी, तुळजापूर** ||111

35) राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि ब्राह्मणेतर चळवळ
**डॉ. अनंत दादाराव मरकाळे, बीड** ||114

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

८. प्रौढ महिलांसाठी शिक्षणः

९. विधवा पुनर्विवाह कायदा : जुलै १९१७

१०. अंतर धर्मीय व अंतर जातीय विवाह कायदा : जुलै १९१९

असे अनेक महत्वपुर्ण कार्य शाहु राजांनी केले. या कार्यामुळे राज्याचे संस्थान प्रगतीपथावर होते. आज जे काही महाराष्ट्राची प्रगती आहे. त्यात शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्यांचा खुप मोठा सहभाग आहे हे विसरता कामा नये. त्यांचा आदर्श पुढे ठेवून महाराष्ट्राची जडन घडन करणे गरजेचे आहे.

**सारांश :**

१९ वे शतक हे भारतीयांसाठी क्रांतीकारी होते. या काळात महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महापुरुष होऊन गेले. त्यांनी समाजातील विषमतावादी व्यवस्था बदलून माणसांना माणूस म्हणून वागणूक मिळावी यासाठी संपुर्ण आयुष्य देशहितासाठी खर्ची घातले त्यांच्या विचार आणि कार्यामुळेच भारताची आज जी सुधारणा झाली आहे. हे त्यांच्या कार्याचे फळ आहे. त्यांचे विचार आणि कार्य आजही प्रेरणादायी आहे आणि पुढेही राहतील. त्या विचाराने जो व्यक्ति, समुह, समाज, देश यांची प्रगती झाल्या शिवाय राहणार नाही. हे सुर्य प्रकाशाऐवढे सत्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


१. आधुनिक भारतीय विचारवंत डॉ. साहेबराव गाठाळ
२. ज्योतिरव फुले समाज तत्वज्ञान - डॉ. सरोज आगलावे.
३. महाराष्ट्रातील समाज सुधारक डॉ. एस.एस. गाठाळ
४. महात्मा फुले समग्र
५. भारतीय समाजक्रांतीचे जनम महात्मा ज्योतिराव फुले - प्रा.ना.ग.पवार आणि अविनाश वरोकर.
६. डॉ.जयसिंग पवार - राजर्षी शाहु छत्रपती - सुमेरु प्रकाशन, डोंबिवली.
७. धनंजय कीर - राजर्षी छत्रपती शाहू.
८. ओम प्रकाश गायकवाड (संपादक) - लोकराजा राजर्षी शाहू महाराज.
९. मीना कुलकर्णी - राजर्षी शाहु महाराज गौरव ग्रंथ.
१०. डॉ.ए.एस. कोंडकर-रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज-अरुण प्रकाशन लातूर ❑❑❑


29

# राजर्षी शाहु महाराजांचे जलविषयक धोरण


**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब,
ता. कळंब, जि. उस्मानाबाद


**********

भारतीय इतिहासाच्या आधुनिक काळात अनेक राजे होऊन गेले, परंतू त्यातील ठराविकच राजे आपल्या कर्तृत्वाने जनसामान्यांच्या हृदयसिंहासनी आरूढ झाले. त्यापैकी कोल्हापुरचे राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांची ख्याती आहे. इ.स. १८९४ ते १९२२ या २८ वर्षांच्या कालावधीत राज्यकारभार करतांना जे अलौकिक कार्य केले, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, आयाम समोर येतात. क्रांतीकारी व क्रियाशील समाजसुधारकाने जनतेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रीडा, कला, आर्थिक, धार्मिक, स्त्रीमुक्ती, सहकार, उद्योग, व्यापार, पर्यावरण, विज्ञान, प्रशासन, आरोग्य, कामगार क्षेत्राबरोबर कृषी व जलसिंचन क्षेत्रातही प्रयोगशीलता राबवून ही दालने समृद्ध केली. विशेषतः आपल्या कारकिर्दीत जलविषयक धोरण राबवून शेती व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साधला. केवळ कोल्हापूर संस्थानच नाही तर सबंध देशवासियांसमोर विकासाचा आदर्श उभा केला. त्यामुळे भविष्यकालीन विकासाची पायाभरणी करण्याचे काम जलविषयक धोरण राबवून केले. त्याचा परामर्श या शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न आहे.

राजर्षी शाहू महाराज २ एप्रिल १८९४ रोजी राजपदी विराजमान झाले. यावेळी त्यांनी आपल्या राज्यातील जनतेस उद्देशून म्हटले, "आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हिताची जपणूक व्हावी आणि जनतेचा विकास व्हावा अशी आमची इच्छा आहे." या भावनेतून लोकोद्धारासाठीच राज्यकारभार केला. प्रथम त्यांनी संपूर्ण संस्थानाची पाहणी केली. त्यांना शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांची जाणीव झाली. त्यांना पाणी मिळत नाही. शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी मुबलक पाणी मिळणे गरजेचे आहे हे त्यांच्या लक्षात आले. भारत हा कृषीप्रधान देश असून बहुसंख्य



Scanned with OKEN Scanner

ग्रामनिवासी असणाऱ्यांचा व्यवसाय शेती आहे. शेती हेच उदरनिर्वाहाचे व विकासाचे साधन आहे. काळाच्या ओघात दिवसेंदिवस शेतीच्या प्रगती अभावी खेड्याचे आरोग्य बिघडत चालले होते. दुष्काळ व अनियंत्रीत पर्जन्य वृष्टीमुळे कोल्हापूर संस्थानातील शेती व उत्पादनाची अनिश्चितता होती. ही दूर सारून स्थैर्य व शाश्वती आणण्यासाठी शेतीला जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक वाटत होते. शेती सुधारणेकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रकर्षाने जाणवले. राज्यकारभार करतांना १८९६-९७, १८९९-१९०० व १९१८-१९ या तिन्ही वर्षात पर्जन्यमान कमी झाल्याने महाभयंकर दुष्काळास सामोरे जावे लागले. पावसावर अवलंबून असणाऱ्या शेती व्यवसायात पाण्याचे महत्त्व कळाले. मानवी जीवनात जलसंपत्तीचे असाधारण महत्त्व आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाला गती येण्यासाठी पाणी आणि जमीनीचा संयोग हे घटक खूप महत्त्वाचे ठरतात. शेतीचे भवितव्य निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे हे ओळखले. कायमस्वरूपी अशी उपाययोजना केलीच पाहिजे हा ध्यास मनाने घेतला होता. यातच १९०२ मध्ये युरोप दौऱ्यावर गेले असताना तेथील लोकांनी निसर्गातील साधनांचा किती कल्पकतेने आपल्या भौतिक प्रगतीसाठी वापर केल्याचे पाहून भारावून गेले. शेती, व्यापार, उद्योगात युरोपियनांनी घेतलेली आघाडी लक्षात आली. खऱ्या अर्थाने समाजाच्या आर्थिक प्रगतीची भिस्त असलेली शेती आणि व्यापार ही दोन महत्त्वाची चाके आहेत. या दोन्ही क्षेत्रात युरोपियनांनी घेतलेली आघाडी लक्षात आल्याने त्यांनी तेथून परत आल्यानंतर जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले. भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलाधार असणारी शेती विकसित करण्यावर भर दिला. ज्यातून हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

सातत्याने भेडसावणाऱ्या दुष्काळासारख्या समस्येचे निराकरण करण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे शेतीला पाणीपुरवठा करणे होय. हे लक्षात घेऊन त्यांनी १९०२ मध्ये 'सार्वजनिक पाटबंधारे धोरण' जाहीर करून तिथे एरिगेशन ऑफीसरची नेमणूक केली. संपूर्ण संस्थानचा जलसिंचनाचा आढावा तज्ज्ञांकडून करून घेतला. तसे पाहता प्रारंभा पासूनच त्यांनी संस्थानातील जलसिंचन सोयींचा प्रारंभ केलेला दिसतो. या कार्यास अधिक गती, प्रेरणा मिळाली ती युरोप दौऱ्याहून परतल्यानंतर हे मात्र नक्की. पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब अडवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामध्ये जुन्या विहिरी, तलाव, धरणे अशा लहान-मोठ्या जलस्त्रोतांचे पुनरूज्जीवन केले. काही विहिरी, तलावांची नव्याने बांधणी तर काहींची पुनर्बांधणी करून शेतीला अधिक पाणी कसे मिळेल, शेतीची उत्पादकता कशी वाढेल, आधुनिक शेतीला कशी चालना मिळेल यासाठी मोठे प्रयत्न केले. अगदी नमुन्यादाखल सांगायचे झाले तर १९०१ ते १९१० या काळात कच्च्या व पक्क्या विहिरींची संख्या एक हजारांनी वाढली. संस्थानातील भुदरगड, गडहिंग्लज, पन्हाळा, गारगोटी यांसारख्या भागात पाण्याअभावी कृषीजीवन पार कोलमडले होते. शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिल्याने, उत्पादन वाढेल, परिणामी शेती व शेतकऱ्यांचा विकास होईल या हेतूने जुन्या-नव्या विहिरी, तलाव, बंधाऱ्याचा आराखडा तयार करून कृतीपुरक उपक्रम राबविले. 'जेथे पाणी तेथे प्रगती' या सुत्राप्रमाणे संस्थानात हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. परंतू त्यांना अपेक्षित विकास झालेला नव्हता. त्यांच्या मनात शेती व शेतकऱ्याच्या सामाजिक, आर्थिक विकासाची तळमळ सुरूच होती. शाश्वत विकासाची जलसिंचन योजना जोपर्यंत अवतीर्ण होत नाही तोपर्यंत त्यांना स्वस्थता लाभणार नव्हती. या अवस्थेतून हरितक्रांतीचे स्वप्न साकार करण्यासाठी आपली संपूर्ण शक्ती पणाला लावली. अगदी कोल्हापूर संस्थानातून सेवानिवृत्त होऊन मायदेशी गेलेल्या कर्नल फेरिम या इंग्रज अधिकाऱ्यास ते म्हणतात, "आपण येथून निघून गेल्यावर मी सुमारे २० बंधारे बांधले, पण माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही. म्हणून मी आता एक मोठा सिंचन प्रकल्प हाती घेणार आहे. संपूर्ण भारतात असा तो मोठा प्रकल्प असणार आहे. त्यासाठी मी माझी पूर्ण शक्ती लावत आहे. ही योजना यशस्वी व्हावी हीच माझी अंतरीची इच्छा आहे." या तळमळीने आणि जिद्दीने आपले हरितक्रांतीचे स्वप्न साकर करण्यासाठी प्रत्यक्ष १९०९ मध्ये 'राधानगरी' धरणाच्या बांधकामास प्रारंभ केला. सह्याद्रीच्या माथ्यावर प्रचंड पाऊस पडतो व नद्यांच्या माध्यमातून वाहून जातो. तेंव्हा हे पाणी अडवून धरण बांधण्याची कल्पना युरोपियन दौऱ्यात सुचली होती. ती कल्पना 'राधानगरी' धरणाच्या रूपाने त्यांनी साकार केली.

स्वत:ला शेतकरी, शिपाईगडी म्हणून घेण्यात भूषण मानणारे दुरदृष्टीचे समाजसुधारक शाहू महाराजांनी भौगोलिक परिस्थितीचा विचार करून कोल्हापुरच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या घाटात भोगावती नदीच्या जलप्रवाहावर १४ लाख रूपये खर्चून राधानगरी धरणाची उभारणी केली. दरवर्षी ६०० दशलक्ष घनफुट पाणी शेतीसाठी उपलब्ध करून त्यांचे हरितक्रांतीचे स्वप्न साकार झाले. याविषयी त्यांनी म्हटले, "राधानगरी प्रकल्प म्हणजे माझे जीवितकार्य आहे." या धरणाच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे भव्य स्वप्न बाळगले होते म्हणून ते आपल्या पत्रातसुद्धा म्हणताना दिसतात. "हा धरण प्रकल्प जेंव्हा पूर्ण होईल तेंव्हा खऱ्या अर्थाने माझे जीवितकार्य पूर्ण होईल." दुर्दैवाने त्यांच्या हयातीत



Scanned with OKEN Scanner

पूर्ण होऊ शकले नाही. आपल्या प्रजाहितदक्ष पित्याचे अपुरे स्वप्न पूर्ण करण्याचे काम मोठ्या जिद्दीने छत्रपती राजाराम महाराजांनी केले. त्यामुळे करवीरचा कंगाल कुणबी खऱ्या अर्थाने 'बळीराजा' झालेला दिसतो. या भागातील हरितक्रांती हे या धरणाचे फळ आहे. म्हणून 'राधानगरी धरण' हे या जिल्ह्यातील हरितक्रांतीची जननी आहे असे म्हणणे उचित ठरते.

कोल्हापूर संस्थानात पंचगंगा, वारणा, दुधगंगा, वेदगंगा, तुळशी, कुंभी, कासारी, भोगावती, हिरण्यकेशी इत्यादी लहानमोठ्या नद्यांचे जलप्रवाह आपापल्या काठावरती शेती फुलवित होत्या. परंतू सर्वच नद्यांचे पाणी प्रत्यक्षात उपयोगात न येता वाया जात होते. कारण या अमूल्य जलसंपत्तीचा साठा या भागात कोणत्याही योजनेच्या रूपात नव्हता. जलसंपत्ती अभावी बळीराजाने रक्ताचे पाणी करूनही जीवापाड प्रामाणिक प्रयत्न करूनही त्याच्या नशिबी दारिद्र्य येत होते. हा परिसर सुजलाम सुफलाम करण्याच्या अपेक्षेने या भागाची वरदायिनी ठरलेला राधानगरी धरणासारखा मोठा प्रकल्प कार्यान्वित केला. कोल्हापूर संस्थानची सर्वात मोठी पहिली हरितक्रांती ठरली. मुळच्या ४० फुट उंचीच्या धरणाचे बांधकाम १२६ फुटापर्यंत नेल्याने ८३६२ दशलक्ष घनफुट पाणी साठवणक्षमता झाली. ज्याचा वापर शेतीसह वीजनिर्मिती व पिण्यासाठी होताना दिसतो. एकंदरीत त्यांचे जलविषयक धोरण या भागासह राज्याच्या विकासाला पुढे नेणारे ठरले. राधानगरीसारखे मोठे धरण बांधून राज्यात अनेक तलाव, बंधारे, विहिरी यांची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारा व शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांती निर्माण करणारा आधुनिक भारतातील पहिला राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.

**निष्कर्ष :**

राजर्षी शाहू महाराज यांची कारकिर्द म्हणजे भारतीय इतिहासातील सुवर्णकाळ आहे. कारण विविध क्षेत्रासह कृषी, जलसिंचनाच्या क्षेत्रात भरीव असे कार्य केले. राजपदाच्या माध्यमातून कर्मयोग आचरला व कोल्हापूर संस्थानात विकासाची पायाभरणी केली. 'राधानगरी धरण' हे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा कळस आहे. वारंवार पडणाऱ्या दुष्काळ आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी, दारिद्र्यावर मात करण्यासाठी, शेती, शेतकरी व जनसामान्यांच्या विकासासाठी जलविषयक धोरणे आखली व मोठ्या जिद्दीने व तळमळीने कार्यान्वित केले. ज्यातून त्यांची दुरदृष्टी, क्रांतीकारी व क्रियाशील समाजसुधारक म्हणून व्यक्तिमत्त्व पुढे येते. 'शेतकरी सुखी तर आपण सुखी, शेतीचा उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार पर्यायाने देशाचा उद्धार' हे सुत्र लक्षात घेतले. त्यासाठी प्रथम 'पाणी आडवा पाणी जिरवा' हा मंत्र दिला. शेतीसाठी पाण्याची गरज लक्षात घेऊन पाटबंधाऱ्याची व लहानमोठ्या धरणांच्या योजना हाती घेतल्या. विहिरी, तलाव, बंधाऱ्याची नव्याने बांधणी व जुन्यांची पुनर्बांधणी केली. एवढ्यावर त्यांचे समाधान होत नव्हते. शाश्वत विकासासाठी आवश्यक असणाऱ्या जलसाठा उपलब्ध व्हायला हवा. याची प्रेरणा युरोपियन देशातील दौऱ्याच्या पाहणीतून मिळाली. राधानगरीसारखे धरण उभारून हरितक्रांतीचे स्वप्न साकार केले. त्यांनी राबविलेले जलविषयक धोरण प्रेरणादायी व दिशादर्शक आहे. हे धोरण पर्यावरण संतुलन साधणारे आहे. याचा वापर केला तर पाणीप्रश्नाचे कोडे सुटू शकेल व शेतकऱ्याचा विकास होऊन देश अधिक प्रगतीच्या दिशेने, महासत्तेच्या दिशेने निश्चितच वाटचाल करेल. जलविषयक धोरणाची आजही समाजाला गरज आहे. निश्चितच जनता त्यातून बोध घेईल. त्यांनी केलेल्या उपाययोजना फायदेशीर ठरल्या आहेत. कोल्हापूर हरितक्रांतीत अग्रेसर आहे. आजही अनेक भागात पाणीटंचाईच्या झळा बसताहेत तेंव्हा भौगोलिक परिस्थितीचा विचार करून शाहू महाराजांप्रमाणे कृत्रिम तळे, बंधारे यांची बांधणी केली, पावसाचे पाणी वाया जाऊ न देता 'पाणी आडवा पाणी जिरवा' हे सुत्र वापरून योजना राबविल्या तर निश्चितच भविष्यातील पाणीप्रश्न सुटण्यास मदत होईल. विविध क्षेत्रासह जलसिंचन क्षेत्रातही विचाराला कृतीची जोड देणारा हा कार्यप्रवण राजा समाजहितासाठी कार्यरत राहिला. त्यामुळे ते हरितक्रांतीचे अग्रदूतच नाही तर प्रथम ते छत्रपती म्हणून पुढे आले आणि नंतर ते लोकराजे म्हणून मान्यता पावलेले दिसतात.

**संदर्भग्रंथ :**

१. (संपा.) डॉ. नारायण कांबळे, व्यंकट बलांडे, डॉ. संजय शिंदे, 'राजर्षी शाहू : नव्या दिशा नवे चिंतन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी २०१९.

२. डॉ. रमेश जाधव, 'लोकराजा शाहू छत्रपती', शैलेंद्र प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, ३० ऑगस्ट १९९७.

३. (संपा.) डॉ. आर. एन. करपे, 'राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २६ जून २०१२.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner